# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** विकास योजना – नागपूर महानगरपालिका जिल्हा नागपूर अंतर्गत
**{नगर रचना विभाग}** मौजा – नरसाळा, सर्व्हे क्र. 188/2 व 188/3 आराजी अनुक्रमे 1.00 हे.आर. व 1.00 हेक्टर आर एकुण आराजी 2.00 हे.आर. शेत जमिन कृषी विभागातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस – 2496 –2643–प्र.क्र.300(अ)–97–नवि–9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस–2400–1628–सी.आर.–200– नवि–9, दि. 10.09. 2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस–2401–885–प्र.क्र.–76/नवि–9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र. 154/2019/नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र. 154 (भाग–1)/2019/नवि–9, दि. 09.04.2021 अन्वये सात योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता ना.सु.प्र.ला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत सदर मौजा – नरसाळा या गावाचा समावेश नव्हता. यापुर्वी नागपूर जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक विकास योजनेमध्ये मौजा – नरसाळा या गावाचा समावेश होता. तथापी, शासन निर्णय क्र. 2413/405/प्र.क्र.213/2013/नवि–9, दि. 14.10.2013 अन्वये मौजा – नरसाळा व हुडकेश्वर हे दोन्ही महसुली गावे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे. या मौजामधील विकास परवानगी संदर्भाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 46 अन्वये मंजूर प्रादेशिक योजनेतील प्रस्तावानूषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. उक्त मंजूर प्रादेशिक योजनेमध्ये अर्जदाराची विषयांकित जागा कृषी विभागात समाविष्ठ आहे. तसेच सदर जागेकरीता आता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून आहे.

मौजा – हुडकेश्वर व नरसाळा हया दोन महसुली गावे शासन निर्णय क्र. 2413/405/प्र.क्र. 213/2013/नवि–9, दि. 14.10.2013 रोजीच्या अधिसूचनेनूसार नागपूर महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ झाल्याने सदर क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिकाआहे. सदर जागा नागपूर जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक विकास आराखडयामध्ये कृषी विभागात समाविष्ट आहे नागपूर शहराच्या विकास आराखडा सुधारीत करण्याची कार्यवाही सुरू असून या करीता उपसंचालक, विशेष घटक, विकास योजना यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. विकास योजना सुधारीत

करण्याचे कामामध्ये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याचे काम सुरू असून तद्नंतर प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करून सदर विकास योजना शासनास मंजूरीस्तव सादर करणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

जमिन मालक मे. श्री. सिध्दविनायक हाऊसिंग एजन्सी तर्फे भागीदार श्री. प्रभाकर विठ्ठलराव काळे यांचे विनंतीनूसार नागपूर जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक योजना आराखडयातील मौजा – नरसाळा, सर्व्हे क्र. 188/2 व 188/3 आराजी अनुक्रमे 1.00 हे.आर. व 1.00 हेक्टर आर एकुण आराजी 2.00 हे.आर. ''कृषी'' विभागात समाविष्ट असलेली सदर जागा रहिवासी विभागात समाविष्ट करणेबाबतच्या फेरबदलाचा प्रस्ताव असून प्रस्तावित फेरबदल करावयाचा जागे सभोवताल रहिवास तसेच वाणिज्य विकास झाल्याची बाब विचारात घेता सदर जागेचा वापर बदल करून ही जागा कृषी विभागातून वगळून 'रहिवासी' विभागात समाविष्ठ करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणे आवश्यक आहे. या करीता प्रशासकीय ठराव पारित करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. या करीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/हरकतीवर सुनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तद्नंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याकरीता प्रस्तावित आहे.

(सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.)

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- १४/मनपा/प्रशासक** **दिनांक :- ०७/०६/२०२२**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१(भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सहा. संचालक, नगर रचना विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानूसार विकास योजना – नागपूर महानगरपालिका जिल्हा नागपूर अंतर्गत मौजा – नरसाळा, सर्व्हे क्र. 188/2 व 188/3 आराजी अनुक्रमे 1.00 हे.आर. व 1.00 हेक्टर आर एकुण आराजी 2.00 हे.आर. शेत जमिन कृषी विभागातून वगळून रहिवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत.

नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 31(1) अन्वये शासन, अधिसुचना नगर विकास विभाग क्र. टिपीएस – 2496 –2643–प्र.क्र.300(अ)–97–नवि–9, दि. 07 जानेवारी 2000 अन्वये भागशः मंजुर झाली असून ती दि. 01 मार्च 2000 पासून अमंलात आली आहे. तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना शासन

अधिसुचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस–2400–1628–सी.आर.–200– नवि–9, दि. 10.09. 2001 अन्वये मंजुर झाली असून ती दि. 21.09.2001 पासून अमंलात आलेली आहे. तसेच शासनाचे नगर विकास विभागाचे अधिसुचना क्र. टिपीएस–2401–885–प्र.क्र.–76/नवि–9, दि. 27 फेब्रुवारी 2002 अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रांअंतर्गत सात योजनांचे क्षेत्र वगळुन उर्वरीत नागपूर शहराकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र. 154/2019/नवि–9, दि. 27.08.2019 अन्वये संपुर्ण क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिकेला नियोजन प्राधिकरण घोषित केलेले होते. तद्नंतर शासनाकडील निर्णय क्र. टिपीएस–2419/1419/प्र.क्र. 154 (भाग–1)/2019/नवि–9, दि. 09.04.2021 अन्वये सात योजनेतील स्मार्ट सिटी अंतर्गत नगर रचना योजनेतील क्षेत्र वगळून पुन्हा त्या क्षेत्राकरीता ना.सु.प्र.ला नियोजन प्राधिकरण म्हणून घोषित केलेले आहे. नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेत सदर मौजा – नरसाळा या गावाचा समावेश नव्हता. यापुर्वी नागपूर जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक विकास योजनेमध्ये मौजा – नरसाळा या गावाचा समावेश होता. तथापी, शासन निर्णय क्र. 2413/405/प्र.क्र.213/2013/नवि–9, दि. 14.10.2013 अन्वये मौजा – नरसाळा व हुडकेश्वर हे दोन्ही महसुली गावे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ठ करण्यात आलेली आहे. या मौजामधील विकास परवानगी संदर्भाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 46 अन्वये मंजूर प्रादेशिक योजनेतील प्रस्तावानूषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. उक्त मंजूर प्रादेशिक योजनेमध्ये अर्जदाराची विषयांकित जागा कृषी विभागात समाविष्ठ आहे. तसेच सदर जागेकरीता आता नागपूर महानगरपालिका नियोजन प्राधिकरण म्हणून आहे.

मौजा – हुडकेश्वर व नरसाळा हया दोन महसुली गावे शासन निर्णय क्र. 2413/405/प्र.क्र. 213/2013/नवि–9, दि. 14.10.2013 रोजीच्या अधिसूचनेनूसार नागपूर महानगरपालिका हद्दीत समाविष्ठ झाल्याने सदर क्षेत्राकरीता नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिकाआहे. सदर जागा नागपूर जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक विकास आराखडयामध्ये कृषी विभागात समाविष्ट आहे नागपूर शहराच्या विकास आराखडा सुधारीत करण्याची कार्यवाही सुरू असून या करीता उपसंचालक, विशेष घटक, विकास योजना यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. विकास योजना सुधारीत करण्याचे कामामध्ये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याचे काम सुरू असून तद्नंतर प्रस्तावित जमिन वापर नकाशा तयार करून सदर विकास योजना शासनास मंजूरीस्तव सादर करणेस काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

जमिन मालक मे. श्री. सिध्दविनायक हाऊसिंग एजन्सी तर्फे भागीदार श्री. प्रभाकर विठ्ठलराव काळे यांचे विनंतीनूसार नागपूर जिल्हयाच्या मंजूर प्रादेशिक योजना आराखडयातील मौजा – नरसाळा, सर्व्हे क्र. 188/2 व 188/3 आराजी अनुक्रमे 1.00 हे.आर. व 1.00 हेक्टर आर एकुण आराजी 2.00 हे.आर. ''कृषी'' विभागात समाविष्ट असलेली सदर जागा रहिवासी विभागात समाविष्ट करणेबाबतच्या फेरबदलाचा प्रस्ताव असून प्रस्तावित फेरबदल करावयाचा जागे सभोवताल रहिवास तसेच वाणिज्य विकास झाल्याची बाब विचारात घेता सदर जागेचा वापर बदल करून ही जागा कृषी विभागातून वगळून 'रहिवासी' विभागात समाविष्ठ करण्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये फेरबदल प्रस्ताव कार्यान्वीत करणे

आवश्यक आहे. या करीता प्रशासकीय ठराव पारित करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेतर्फे केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. या करीता प्रशासकीय ठराव पारीत करून सदर फेरबदल प्रस्तावाबाबत संपुर्ण वैधानिक कार्यवाही केल्यानंतर सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करणे आवश्यक आहे. याकरीता सदर फेरबदलाची सुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणे त्यावर प्राप्त आक्षेप/हरकतीवर सुनावणी देऊन योग्य निर्णय घेऊन व तद्नंतर उक्त प्रस्ताव शासनास मंजुरीस्तव सादर करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**